महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
उत्सव इमारत,शिवनेरी पथ,बिबवेवाडी,पुणे-३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. - 020-25508700
जा.क्र. ६३८४ दि.- ५/१/२०१९

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक - ०३/०१/२०१९ दिनांक - दुपारी ०३.३० वा.

स्थळ - महापालिका सहायक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, उत्सव इमारत, शिवनेरी पथ, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,

**श्री.राजेंद्र मारूती गुरव**
स.नं.४७/३, शांतीबन अपार्टमेंट, फ्लॅट नं.२,
पहिला मजला, सुरभि मंगल कार्यालय लेन,
तावरे कॉलनी, पुणे ४११००९.
} **अपिलार्थी**

**श्री.अनिल सोनवणे**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
} **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

### माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

श्री.राजेंद्र मारूती गुरव (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक २०/१०/२०१८ रोजीचा अर्ज दिनांक २५/१०/२०१८ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अभियतंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक २५/१०/२०१८ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मे.वृषभ कन्स्ट्रक्शन यांना पुणे महानगरपालिके तर्फे देण्यात आलेले दाखले (१) जा.क्र.४/४४४ दि.०४/०९/२०१८, विकेंद्रीत कामे विभाग क्र.३ जा.क्र.२/५६४ दि.०४/०९/२०१८ एकत्रित दाखला (२) बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय जा.क्र.४/४४५ दि.०४/०९/२०१८ याबाबतची माहिती विचारलेली होती

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| २०/१०/२०१८ | २५/१०/२०१८ | १९/११/२०१८ | २९/११/२०१८ | १० |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती उपलब्ध करून न दिल्याने अपिल अर्ज दिनांक ०५/१२/२०१८ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| ०५/१२/२०१८ | ०५/१२/२०१८ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ - दि.०३/०१/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वा.
सुनावणीस अपिलकर्ता - अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा.जनमाहिती अधिकारी - उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील -**

| क्र. | दिलेल्या माहितीचा तपशील |
|---|---|
| मुद्दा क्र.१<br>मुद्दा क्र.२ | माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्जदार यांनी पुणे महानगरपालिके तर्फे मे.वृषभ कन्स्ट्रक्शन यांना देण्यात आलेले दाखले व त्याबाबतच्या माहितीची मागणी केली आहे. अर्जासोबत जोडलेले दाखल पाहता कोणत्याही कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी आढळ होत नाही. तसेच हे दाखले बिबवेवाडी कार्यालयाकडून देण्यात आलेले नाहीत असे आढळून येत आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०३/०१/२०१९ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.राजेंद्र मारती गुरव हे अनुपस्थित होते. सदर दिनांकास श्री.अनिल सोनवणे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्रीमती प्रज्ञा कोडापे हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.राजेंद्र मारूती गुरव यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वयेच्या त्यांच्या अर्जाची माहिती न मिळाल्याने त्यांनी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे. सुनावणीस अपिलार्थी श्री.राजेंद्र मारती गुरव हे अनुपस्थित असल्याने, सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना दुरध्वनीवरून संपर्क साधला असता, त्यांच्या माहिती अधिकार अर्जात नमूद बाबींची माहिती त्यांना प्राप्त झाल्याने व दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे त्यांनी सांगितले आहे.

वरीलप्रमाणे संबंधित जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांनी प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**<u>अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'</u>**

- जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अधिकार अर्जातील बाबींची माहिती उशिराने देणेबाबत केलेल्या विवेचनामुळे व अपिलार्थी श्री.राजेंद्र मारूती गुरव यांचे मिळालेल्या माहितीने समाधान झाल्याने सदरचा अपिल अर्ज निकाली काढणेत येत आहे. तसेच यापुढे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जांची माहिती जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास विहित मुदतीत उपलब्ध करून देणेची दक्षता घ्यावी.

कळावे,

5.01.19

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

<u>टिप –</u>

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत <u>www.punecorporation.org</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.राजेंद्र मारूती गुरव, स.नं.४७/३, शांतीबन अपार्टमेंट, फ्लॅट नं.२, पहिला मजला, तावरे कॉलनी, पुणे ४११००९.
२. श्री.अनिल सोनवणे, जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.
३. श्रीमती प्रज्ञा कोडापे, सहा.जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.